ePaper
विकासाला गती देण्यासाठी सरकारचा तीन 'कर्तव्य' अजेंडा

वर्ष - 9 । अंक - 157 UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™




विकासाला गती देण्यासाठी सरकारचा तीन 'कर्तव्य' अजेंडा

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 02 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

"केंद्रीय अर्थमंत्री सीतारमन यांनी सादर केला बजेट – 5 महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित"

# "अर्थसंकल्प 2026-27: रोजगार निर्मिती, गुंतवणूक वाढ आणि कर सवलती"

महाईन्यूज । नवी दिल्ली

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्यांनी रविवारी सकाळी ११ वाजता देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पासह त्या सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत. या अर्थसंकल्पात रुपयाला बळ देण्यासाठी भांडवलाचा ओघ वाढवण्यासह देशाबाहेर जाणारा पैसा रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आल्या आहेत.**

विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी (सेझ) 'डोमेस्टिक टॅरिफ एरिया' (डीटीए) म्हणजेच स्थानिक भारतीय बाजारपेठेत प्रवेश सुलभ करण्याची सवलत देण्यात आली असून अमेरिकन आयात शुल्कामुळे (टॅरिफ) बसलेला फटका कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सेझ त्यांच्या उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर भारतीय बाजारात निर्यात करतात आणि त्यांना देशांतर्गत विक्रीवर निर्बंध असतात. त्याशिवाय कापड आणि चामड्यासारख्या श्रमप्रधान निर्यात क्षेत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालावरील आणि मध्यवर्ती वस्तूंवरील शुल्कातही बदल करण्यात आले आहेत.

आरोग्य सेवा आणि पर्यटन यांसारख्या सेवा क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती आणि कौशल्य विकासावर सातत्याने भर दिला जात आहे.

## देशातून बाहेर जाणारे भांडवल

देशातून बाहेर जाणाऱ्या भांडवलाबाबत सातत्याने चिंता व्यक्त होत आहे. पीआरओआय अंतर्गत संस्थांसाठी गुंतवणूक मर्यादा १०% २४% आणि वैयक्तिक ५% १०% वाढवण्याचा प्रस्ताव आहे. भारताबाहेरील व्यक्ती 'लिस्टेड इक्वीटी'द्वारे विकासात सहभागी होऊ शकतात. फेमा आढावा घेऊन विदेशी गुंतवणूकदारांसाठी सुलभ फ्रेमवर्क तयार केला जाणार आहे. कॉर्पोरेट बाँड मार्केटसाठी 'मार्केट मेकिंग फ्रेमवर्क' आणि डेटा सेंटर्ससाठी २०४७ पर्यंत कर सवलत प्रस्तावित.

## अर्थसंकल्पातील रोजगार निर्मिती

दरवर्षी मोठ्या संख्येने तरुणांसाठी रोजगार निर्माण करण्याची गरज या अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आली आहे. भविष्यात मोठे वाढीचे क्षेत्र असलेल्या 'केअर-गिव्हर्स'ना प्रशिक्षित करण्यासाठी कार्यक्रम राबवण्यावर भर. जागतिक सेवा निर्यातीत भारताचा वाटा २०४७ पर्यंत १०% पर्यंत वाढवण्यासाठी समिती स्थापन. टूरिस्ट गाईड कौशल्य विकास कार्यक्रम तयार. पर्यटन, केअर सर्व्हिसेस, बायो-फार्मा, टेक्सटाइल्स, उदयोन्मुख तंत्रज्ञान, जहाजबांधणी यावर भर.

## सरकारी भांडवली खर्च

पुढील आर्थिक वर्षासाठी १२.२२ लाख कोटी रुपये खर्चाचे उद्दिष्ट, ११.५% वाढ. सात हाय-स्पीड रेल कॉरिडॉर प्रस्तावित, रस्ते व रेल्वे पायाभूत सुविधा केंद्रस्थानी.

## औद्योगिक विकास

उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढीसाठी



२०० जुन्या औद्योगिक क्लस्टर्स सुधारणा. एमएसएमईसाठी १०,००० कोटी रुपयांचा ग्रोथ फंड, 'आत्मनिर्भर भारत' निधीत २,००० कोटींची भर. अणुऊर्जा प्रोत्साहन, 'रेअर अर्थ कॉरिडॉर', फ्रेट कॉरिडॉर, बंदर कनेक्टिव्हिटी, एआय-केंद्रित डेटा सेंटर्सवर भर.




## जागतिक व्यापार आणि निर्यात

'डोमेस्टिक टॅरिफ एरिया'मध्ये विक्री सुलभ करण्याची उपाययोजना, कच्च्या मालावर सीमाशुल्क कपात, मॅन्युफॅक्चरिंग व कापड क्षेत्रात मदत. १०,००० कोटी रुपयांची कंटेनरनिर्मिती योजना, फ्युचर्स/ऑप्शन्सवर एसटीटी वाढ, बाजारात घसरण.

## कर्ज-जीडीपी गुणोत्तर

कर्ज-जीडीपी ५५.६%, वित्तीय तूट ४.३%, नॉमिनल जीडीपी ३९३ लाख कोटी. १६ व्या वित्त आयोगाने राज्यांचा वाटा ४१% कायम ठेवला आहे.

# मुंबई-पुण्यासह ७ मार्गांवर अतीजलद रेल कॉरिडॉर्स; अर्थमंत्र्यांची मोठी घोषणा

## कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी अतीजलद रेल्वे प्रकल्पांना गती

**महाईन्यूज । पुणे**

**देशातील रेल्वे पायाभूत सुविधा अधिक विस्तारित आणि गतीमान करण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, देशभरात सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर उभारण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. या निर्णयामुळे मुंबई, पुणे, हैदराबाद, बेंगळुरू, चेन्नई, दिल्ली, वाराणसी आणि सिलीगुडी या प्रमुख शहरांना थेट लाभ होणार आहे.**



### कोणत्या सात शहरांमध्ये हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर्स असणार?

हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर्स अंतर्गत मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बेंगळुरू, हैदराबाद-चेन्नई, चेन्नई-बेंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी या सात प्रमुख शहरांदरम्यान अतीजलद रेल्वे मार्ग उभारण्यात येणार आहेत.

अर्थसंकल्पीय भाषणात निर्मला सीतारमण यांनी सांगितले की, पर्यावरणदृष्ट्या शाश्वत आणि आधुनिक प्रवासी वाहतूक व्यवस्थेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हे हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित करण्यात येणार आहेत. शहरांमधील आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला गती देण्यासाठी हे प्रकल्प महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या योजनेअंतर्गत मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई, चेन्नई ते बेंगळुरू, दिल्ली ते वाराणसी आणि वाराणसी ते सिलीगुडी या मार्गांवर अतीजलद रेल्वे कॉरिडॉर उभारण्यात येणार आहेत. या मार्गांमुळे मोठ्या शहरांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होणार असून, रस्ते आणि विमान वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

विशेषतः मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद या मार्गांमुळे महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि पर्यटन क्षेत्रालाही या प्रकल्पांचा मोठा फायदा होईल, असा विश्वास सरकारकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# खून प्रकरणात मदतीसाठी लाच; पोलीस हवालदार अटक

**महाईन्यूज । पुणे**

**खुन प्रकरणात अटक केलेल्या मुलाला लवकर जामीन मिळवून देण्यासाठी मदत करणे, तसेच न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यासाठी एका महिलेकडे २५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या पोलीस हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. बारामतीतील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात हवालदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

### खून प्रकरणात लाच मागणी; एसीबीची कारवाई

- खून प्रकरणात अटक केलेल्या आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी तसेच आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पोलीस हवालदार रमेश लक्ष्मण नागटिळक (वय ४२,
- रा. शारदानगर, माळेगाव, बारामती) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली.

संबंधित गुन्हा वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून, तक्रार एका ४६ वर्षीय महिलेने दिली आहे. एसीबीच्या पडताळणीत लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.




या प्रकरणी पोलीस हवालदार रमेश लक्ष्मण नागटिळक (वय ४२, रा. शारदानगर, माळेगाव, बारामती) याला अटक करण्यात आली. याबाबत एका ४६ वर्षीय महिलेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली आहे. तक्रारदार महिलेच्या मुलाविरुद्ध बारामती परिसरातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास वडगाव निंबाळकर पोलीस

ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या करंजेपुल चौकीचे पोलीस चौकीत पोलीस हवालदार रमेश नागटिळक नियुक्तीस आहे. तक्रारदार महिलेच्या मुलास जामीन मिळवून देण्यासाठी मदत करतो, तसेच आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यासाठी हवालदार नागटिळक आणि चौकीतील उपनिरीक्षकाने तक्रारदाराकडे ३० हजार रुपयांची लाच मागतिली, अशी तक्रार महिलेने १८ जानेवारी रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात आली.

नागटिळक याने महिलेकडे तडजोडीत २५ हजार रुपयांची लाच मागितली. मात्र, उपनिरीक्षकाने लाच मागितली नसल्याचे उघडकीस आले. नागटिळक याने लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन पोलीस हवालदार नागटिळक याला अटक करण्यात आली. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे आणि पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक आसावरी शेडगे तपास करत आहेत.

# विकसित भारत २०४७ च्या स्वप्नपूर्तीसाठी बुलंद हुंकार..!

## केंद्रीय अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक व सामाजिक प्रगतीचा नवा सूर्योदय – आमदार अमित गोरखे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत देशाचा अर्थसंकल्प 2026-27 सादर केला, ज्याकडे 'विकसित भारताचा रोडमॅप' म्हणून पाहिले जात आहे. या अर्थसंकल्पात देशाला आणि राज्याला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी पायाभूत सुविधा आणि मध्यमवर्गीयांच्या कल्याणावर विशेष भर दिला आहे.**



### उद्योग व रोजगाराला चालना

- MSME साठी ₹20,000 कोटींची अतिरिक्त क्रेडिट गॅरंटी
- नवउद्योजकांसाठी विशेष डेस्क व सुलभ परवाने
- EV व बॅटरी उत्पादनासाठी PLI SCHEME 2.0 अंतर्गत ₹18,000 कोटींची तरतूद

### कौशल्य विकास व शिक्षण

- इंटरनॅशनल स्किल डेव्हलपमेंट सेंटरची उभारणी
- विद्यार्थ्यांसाठी सुधारित वसतिगृहे, लायब्ररी, इंटरनेट सुविधा

आमदार अमित गोरखे यांच्या मते, या अर्थसंकल्पाचे सकारात्मक परिणाम स्थानिक स्तरावरही उमटणार आहेत. नव्या तरतुदींमुळे पिंपरी-चिंचवडच्या विकासाला आणि स्थानिक उद्योगांना मोठी चालना मिळणार असून, दळणवळण, रोजगार आणि आधुनिक सुविधांच्या बाबतीत हा अर्थसंकल्प शहरासाठी खऱ्या अर्थाने 'गेम चेंजर' ठरणार आहे.

पिंपरी-चिंचवड हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे औद्योगिक शहर असून येथील लघु व मध्यम उद्योगांना जागतिक स्पर्धेत टिकवण्यासाठी आर्थिक बळकटी देणे आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करणे ही शहराच्या विकासाची प्राथमिकता आहे. आजच्या अर्थसंकल्पामुळे शहराचा सर्वांगीण विकास, रेल्वेचे जाळे आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील तरुणांसाठी विशेष संधी या बाबींवर लक्ष केंद्रित झाले आहे.

शहरातील नवउद्योजकांसाठी भांडवल व तांत्रिक मदतीसाठी विशेष डेस्क सुरू होणार आहे. या अंतर्गत स्थानिक महापालिकेच्या परवानग्या सुलभ करण्यासोबतच उद्योगांसाठी लागणारी जागा आणि वीज सवलतीसाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा होईल. तसेच, MSME क्षेत्रासाठी जाहीर केलेली ₹20,000 कोटींची अतिरिक्त क्रेडिट गॅरंटी लघुउद्योजकांना विनाअडथळा कर्ज मिळवून देईल.

स्मार्ट सिटी मिशन आणि औद्योगिक कॉरिडॉरसाठीच्या भरीव निधीतून शहरात आधुनिक लॉजिस्टिक्स पार्क आणि रस्ते विकसित होत आहेत. त्याच बरोबरीने, केंद्रीय अर्थसंकल्पात मुंबई-पुणे हाई-स्पीड रेल्वे कॉरिडॉर आणि देशभरात 7 नवीन हाई-स्पीड रेल्वे कॉरिडॉरांच्या विकासास मान्यता देण्यात आली आहे, ज्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या व्यापारी आणि औद्योगिक कनेक्टिव्हिटीचा दर्जा आणखी उंचावला जाणार आहे. या प्रकल्पांमुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि व्यवसाय, शिक्षण व रोजगार संधींसह आर्थिक व सामाजिक प्रगतीही गतीने साधता येणार आहे.

PLI SCHEME 2.0 अंतर्गत ₹18,000 कोटींची तरतूद झाल्याने पिंपरी-चिंचवड इलेक्ट्रिक वाहन (EV) आणि बॅटरी उत्पादनाचा जागतिक हब बनण्याच्या मार्गावर आहे. आजच्या अर्थसंकल्पामुळे लोकल गाड्यांची संख्या वाढेल, याचा थेट फायदा पिंपरी-चिंचवडमधील लाखो कामगार आणि विद्यार्थ्यांना होणार आहे.

केवळ पदव्या देणारे शिक्षण पुरेसे नाही, तर उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करणे ही गरज आहे. यासाठी शहरात 'इंटरनॅशनल स्किल डेव्हलपमेंट सेंटर' उभारले जाणार आहे.

तसेच, एससी प्रवर्गातील तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मुद्रा आणि स्टँड-अप इंडिया योजना प्रभावीपणे राबवून बँक कर्ज मिळवून देण्यासाठी मदत केंद्र सुरू होणार आहे. याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, इतर शिष्यवृत्ती, व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम, तसेच सवलतीच्या रहिवासी सुविधा व शिष्यवृत्ती केंद्रे यांचा लाभ तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल. शहरातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांची अवस्था सुधारून आधुनिक शिक्षण, वसतिगृह सुविधा, संगणक सुविधा, लायब्ररी, इंटरनेट सुविधा, तसेच आरामदायी राहण्याची सोय उपलब्ध करून दिल्या जातील.

आमदार अमित गोरखे यांनी ठामपणे सांगितले की, हा अर्थसंकल्प पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी

खऱ्या अर्थाने गेम चेंजर ठरेल आणि येथील नागरिकांसाठी सकारात्मक बदल व संधी निर्माण करेल.

# ओला, सुका, घातक व सॅनिटरी कचरा वेगळा देण्याचे महापालिकेचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेकडून शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने व्यापक जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने नागरिकांनी घरगुती कचरा चार प्रकारांत विलगीकरण करूनच कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडीला द्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.**



### कचऱ्याचे असे करा विलगीकरण

- ओला कचरा – उरलेले अन्नपदार्थ, भाजीपाल्याचे तुकडे, फळांच्या साली इत्यादी; यासाठी हिरव्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- सुका कचरा – कागद, प्लास्टिक, काच, धातूच्या वस्तू, यासाठी निळ्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- घरगुती घातक कचरा – बॅटऱ्या, ट्यूबलाईट/बल्ब, औषधांचे अवशेष, रसायनयुक्त वस्तू; यासाठी काळ्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- सॅनिटरी कचरा – सॅनिटरी पॅड, डायपर, वैद्यकीय वापरातील साहित्य; यासाठी लाल रंगाच्या डब्याचा वापर करावा.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली शहरातील सर्व प्रभागांमध्ये ही जनजागृती मोहीम वेगाने राबवली जात आहे. या मोहिमेत घराघरांत संपर्क, फलक, पत्रके, समाजमाध्यमांद्वारे संदेश, तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.



नागरिकांना कचरा विलगीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले जात आहे. योग्य पद्धतीने विलगीकरण केल्यास कचऱ्यावर वैज्ञानिक प्रक्रिया करणे सुलभ होते, पुनर्वापराचे प्रमाण वाढते, लँडफिलवरील ताण कमी होतो आणि पर्यावरण संवर्धनास चालना मिळते. तसेच शहरातील दुर्गंधी, कचऱ्याचे ढीग व प्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी घरातील कचरा चार प्रकारांत वेगळा करून तो वेळेत महापालिकेच्या घंटागाडीला द्यावा. कचरा इतरत्र न टाकता नियमानुसार संकलन वाहनालाच देऊन आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असेही आवाहन प्रशासनाने केले आहे.



## भूमिका

भारताच्या अर्थव्यवस्थेचा वार्षिक 'रिपोर्ट कार्ड' मानला जाणारा 2025-26 चा आर्थिक पाहणी अहवाल संसदेत सादर करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हा अहवाल लोकसभेत मांडला असून, सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तो तयार केला आहे.

# लवचिक अर्थव्यवस्था, संधी आणि आव्हाने

केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी प्रसिद्ध होणारा हा अहवाल देशाच्या आर्थिक आरोग्याची तपासणी करणारा महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. यातून सध्याची आर्थिक स्थिती, पुढील काळातील दिशा, संधी आणि संभाव्य धोके स्पष्टपणे समोर येतात.




जागतिक पातळीवर सध्या अस्थिरतेचे वातावरण आहे. रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, अमेरिका-चीन व्यापार युद्ध आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर दबाव आहे. अशा परिस्थितीतही भारताने आपली अर्थव्यवस्था स्थिर ठेवली असून सलग चौथ्या वर्षी जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान कायम राखले आहे. ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे.1991 साली पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली भारताने स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणांचा परिणाम आजही दिसून येतो. 2008 मधील जागतिक मंदी, कोरोनासारखी महामारी किंवा आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे – या सर्व संकटांमधून भारतीय अर्थव्यवस्था तग धरून उभी राहिली आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार 2025-26 मध्ये देशाचा जीडीपी विकासदर 7.4 टक्के राहण्याचा अंदाज आहे, तर 2026-27 मध्ये तो 6.8 ते 7.2 टक्क्यांच्या दरम्यान राहील, असा आशावाद व्यक्त करण्यात आला आहे. मात्र आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने हा दर 6.4 टक्के राहील, असा अंदाज वर्तवला असून सातत्य टिकवणे हे मोठे आव्हान ठरणार आहे.

उद्योग क्षेत्रात पहिल्या सहामाहीत 8.4 टक्के वाढ झाली असली, तरी कृषी व पूरक क्षेत्रातील वाढ 3.1 टक्क्यांपर्यंत मर्यादित राहण्याची शक्यता आहे. कृषी, पशुधन, वने आणि मत्स्यव्यवसाय या क्षेत्रांचा विकासदर मागील वर्षाच्या तुलनेत कमी झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कृषी आणि उद्योग क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

महागाईच्या बाबतीत मात्र दिलासादायक चित्र समोर आले आहे. एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत सरासरी महागाई दर 1.7 टक्क्यांपर्यंत खाली आला असून, हा आतापर्यंतचा नीचांकी स्तर मानला जातो. तसेच बेरोजगारीचा दर 2017-18 मधील 6 टक्क्यांवरून 2023-24 मध्ये 3.2 टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने ही सकारात्मक बाब आहे.

निर्यातीच्या बाबतीतही भारताने चांगली कामगिरी केली आहे. देशाची एकूण निर्यात 825.3 अब्ज डॉलरवर पोहोचली असून, वस्तू निर्यातीत 2.4 टक्के आणि सेवा निर्यातीत 6.5 टक्के वाढ झाली आहे. प्रतिकूल जागतिक परिस्थितीतही हे यश उल्लेखनीय ठरते.

मात्र लोकानुनयी योजनांमुळे राज्यांच्या आर्थिक तिजोरीवर ताण येत असल्याचेही अहवाल अप्रत्यक्षपणे अधोरेखित करतो. रेवडी संस्कृतीऐवजी उत्पादन, रोजगारनिर्मिती, उद्योगपूरक वातावरण आणि शेतमालाला योग्य दर यांवर भर देण्याची गरज आहे. एकूणच आर्थिक पाहणी अहवाल भारताच्या मजबूत आणि लवचिक अर्थव्यवस्थेचे चित्र मांडतो, पण दीर्घकालीन स्थैर्यासाठी शहाणपणाचे आर्थिक निर्णय आवश्यक असल्याचेही स्पष्ट करतो.

## प्रासंगिक »

### अपार ज्ञानासमोरची नम्रता

***आद्यगुरु शंकराचार्य हिमालयाकडे यात्रेसाठी चालले होते. त्यांच्याबरोबर त्यांचे सर्व शिष्य हि होते. प्रवास करता करता ते अलकनंदा नदीच्या पात्रापाशी येवून थांबले. तेंव्हा एका शिष्याने शंकराचार्यांची स्तुती करण्यास सुरुवात केली.***

शिष्य म्हणू लागला,"आचार्य ! आपण किती महान आहात, आपले ज्ञान किती मोठे आहे जणू या अलकनंदा नदीच्या पात्राप्रमाणे. हे पात्र जितके विस्तीर्ण आहे तितके तुमचे ज्ञान असावे असे मला वाटते. कदाचित यापेक्षा महासागराइतकेही तुमचे ज्ञान असू शकेल."त्याचवेळी शंकराचार्यांनी आपल्या हातातील दंड पाण्यात बुडवला आणि बाहेर काढला, शिष्य या कृतीकडे पाहत होता. पाण्यातून बाहेर काढलेला दंड शिष्याला दाखवून शंकराचार्य म्हणाले," बघ, किती पाणी आले या दंडावर? एक थेंब इतकेच ना! अरे! मला किती ज्ञान आहे ते सांगू का? जगातील ज्ञान म्हणजे अलकनंदा नदीचे पात्र आहे असे समज आणि दंड बुडवून बाहेर काढल्यावर त्यावर आलेला थेंब म्हणजे माझे ज्ञान." जगात प्रचंड ज्ञान आहे. **तात्पर्य:** खरे ज्ञान नम्रतेत असते. जगातील अपार ज्ञानापुढे आपले ज्ञान केवळ एक थेंब आहे.

2021 मध्ये म्यानमारमध्ये लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या नेत्या आंग सान सू की यांच्या सरकारला लष्कराने उलथवून सत्ता काबीज केली. निवडणुकीत कथित गैरप्रकार झाल्याचा आरोप करत सू की यांना तब्बल 27 वर्षांचा तुरुंगवास सुनावण्यात आला.

# निवडणुकीची मलमपट्टी : लष्करी सत्तेला वैधतेचा आभास

त्यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमॉक्रेसी' या लोकप्रिय पक्षाने लष्करी नियमांनुसार नोंदणी करण्यास नकार दिल्यानंतर 2023 मध्ये हा पक्ष बरखास्त करण्यात आला. अनेक विरोधी पक्षांनीही अन्यायकारक वातावरणात निवडणुका लढवण्यास नकार दिला. त्यामुळे विरोधकांना नेस्तनाबूत करणे, लोकप्रिय नेत्यांना कारागृहात डांबणे, प्रसारमाध्यमांवर निर्बंध आणणे आणि निवडणुकीवर टीका करणाऱ्यांना कठोर शिक्षा देणारे कायदे लागू करणे, अशा पार्श्वभूमीवर ही निवडणूक पार पडली.

विश्लेषकांच्या मते देशाच्या सुमारे एक तृतीयांश भूभागाला मतदान प्रक्रियेपासून वगळण्यात आले. अनेक भाग लष्करविरोधी गटांच्या नियंत्रणाखाली असून काही ठिकाणी सशस्त्र संघर्ष सुरू आहे. संयुक्त राष्ट्र संघ, मानवाधिकार तज्ज्ञ, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि युरोपियन महासंघाने या निवडणुकीला वैधता नाकारली आहे. संसदेतील 25 टक्के जागा



लष्करासाठी राखीव ठेवणे आणि लष्करसमर्थित पक्षाने मोठ्या प्रमाणात जागा जिंकणे, यामुळे कायदे मंडळावर लष्कराचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.

म्यानमारमधील अंतर्गत संकटे अद्याप शमलेली नाहीत. सशस्त्र संघर्ष सुरूच असून आतापर्यंत हजारो लोकांचा बळी गेला आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अंदाजानुसार सुमारे 90 हजारांहून अधिक लोक या यादवीत मारले गेले असावेत. करेनसारख्या वांशिक गटांनी स्वातंत्र्याच्या घोषणा केल्यामुळे देशाच्या संभाव्य विभाजनाची भीती वाढली आहे. रशिया आणि चीनच्या पाठबळावर लष्कर सत्तेत टिकून असले तरी प्रत्यक्षात देशाची एकात्मता अधिकच ढासळत आहे.

या संघर्षाचा मोठा परिणाम म्यानमारच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे. 2021 नंतर अर्थव्यवस्था जवळपास कोलमडली आहे. महागाई दर 20 ते 30 टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. वीजटंचाईमुळे उद्योगधंदे ठप्प झाले असून 'क्यात' चलन डॉलरच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात घसरले आहे. निम्म्याहून अधिक लोकसंख्या गरिबीरेषेखाली गेली असून विदेशी गुंतवणूकही रोडावली आहे.

म्यानमारमधील अस्थिरतेचे परिणाम भारतावरही होत आहेत. सीमेलगतच्या भागातून मोठ्या प्रमाणावर निर्वासित भारतात दाखल होत असून मिझोराम, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेशावर त्याचा ताण वाढत आहे. एकूणच, ही निवडणूक लोकशाही पुनर्स्थापनेसाठी नसून लष्करी सत्तेला वैधतेचा मुलामा देण्याचा प्रयत्न आहे.

## ।। अभंगवाणी ।।



लोक निंदा करी, लोक स्तुती करी ।
हरीविण सुख काय मोलाचें ॥१॥

सोडिली आस मी देहभावाची ।
तुका म्हणे ठायीं ठायीं तूचि ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्राला मिळणार सुमारे 1 लाख कोटी!

## विकसित भारताकडे दमदार पाऊल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**महाईन्यूज । मुंबई :**

**देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत देशाचे बजेट सादर केले. यानंतर या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या पदरात काय पडले? याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.**



देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या स्वप्नाकडे जाणारे एक दमदार पाऊल आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. वाढत्या शहरीकरणाला नियोजनबद्ध करण्यासाठी पहिल्यांदाच ५ लाख पेक्षा जास्त लोकसंख्येच्या वरच्या शहरांचा एकात्मिक विचार या अर्थसंकल्पाने केला आहे. ज्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल, विशेषतः मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती हे या अर्थसंकल्पाचे ध्येय दिसत आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

फडणवीस पुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र सरकार करणार आहे. १० वर्षांपूर्वी वर्षाला एक लाख कोटींची गुंतवणूक आपण करायचो, त्यावरून एकाच वर्षात १२ लाख कोटींची गुंतवणूक हा एक महत्त्वाचा मुद्दा पाहाता येईल. शेती, पशू पालन, मत्स्य व्यवसाय आणि सिंचन या ४ क्षेत्रांसाठी भरीव तरतूदी आणि योजना, तसेच यात गुंतवणूक होईल यासाठी एक चांगला प्लॅन या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सीतारमण यांनी घोषित केला आहे, असेही फडणवीस म्हणाले.



प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल ही योजना घोषित करण्यात आली आहे. आपली आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या रुग्णालयात कॅज्युअल्टी आणि ट्रॉमा सेंटर तयार करण्यात येणार आहे. ज्यामुळे ग्रामिण आणि गरीब लोकांसाठी व्यवस्था तयार होईल.

सर्व ग्रोथ हब्ससाठी ५ वर्षात प्रत्येकी ५ हजार कोटी देण्याचा एक कार्यक्रम आखण्यात आला आहे. याचा फायदा महाराष्ट्राला होईल, कारण आपण एमएमआर ग्रोथ हब, पुणे ग्रोथ हब आणि नागपूर ग्रोथ हब असे तीन ग्रोथ हब आपण नीती आयोगाच्या माध्यमातून तयार केले आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

अनेक वर्षांपासून मागणी असलेला मुंबई-पुणे कॉरिडॉर याची घोषणा झाली आहे. पुणे हैद्राबाद हायस्पीड कॉरिडॉर होतोय, ज्याचा फायदा पश्चिम महाराष्ट्र आणि महाराष्ट्राला फायदा होईल, असे फडणवीस म्हणाले. एकीकडे महाराष्ट्राला डिवोल्यूशन ऑफ टॅक्सेसमधून १ लाख कोटी आणि वेगवेगळ्या योजनांवर देखील मोठ्या प्रमाणात निधी महाराष्ट्राला या अर्थसंकल्पात मिळाला आहे, असे देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

### महाराष्ट्राला अर्थसंकल्पाक काय मिळालं?

- डिवोल्यूशन ऑफ टॅक्सेस (DEVOLUTION OF TAXES) मध्ये जो फॉर्म्युला दिला त्यामध्ये महाराष्ट्राला फायदा झाला आहे. डिवोल्यूशनमध्ये आपण ६.४४ टक्क्यांवर गेलो असल्याने आपल्याला या वर्षी ९८ हजार ३०६ कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळतील. मागील वर्षीपेक्षा जास्त निधी यावर्षी मिळणार आहे.
- ग्रामिण रस्ते प्रकल्प – ३७८ कोटी
- ॲग्री बिझनेस नेटवर्क – १६७ कोटी
- इकॉनॉमिक क्लस्टर – २८३ कोटी
- महाराष्ट्र टर्शरी केअर मेडिकल एज्युकेसन विकास कार्यक्रम यासाठी ३८५ कोटी
- उपसा सिंचन योजनांचे सौरउर्जिकरण २०७ कोटी
- ॲग्री बिझनेस अँड रूरल ट्रान्सफॉर्मेशन ६४६ कोटी
- डेव्हलपमेंट अँड ॲप्लाइड नॉलेज अँड स्कील फॉर ह्युमन डेव्हलपमेंट ३१३ कोटी
- जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमता वृद्धीसाठी २४० कोटी
- मुंबई अहमदाबाद हाय स्पीड कॉरिडॉर ६१०३ कोटी
- मुंबई मेट्रो १७०२ कोटी
- पुणे मेट्रो ५१७ कोटी
- एमयूटीपी ३ मुंबईकरिता ४६२ कोटी
- एमएमआर रिजनमध्ये ग्रीन मोबिलीटी यासाठी १५५ कोटी
- महामार्गावर आयटीएस ६८० कोटी

# कुडाळच्या रणांगणात 'तुतारी'चा कडकडाट

**महाईन्यूज । सातारा**

**सातारा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या २०२६ च्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून, जावळी तालुक्यातील कुडाळ गटात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाकडून जिल्हा परिषदेसाठी सौ. पूनम प्रशांत नायकुडे आणि पंचायत समितीसाठी श्री. राजेंद्र रामचंद्र शिंदे यांनी प्रचाराचा झंझावात सुरू केला आहे. 'तुतारी'च्या या आवाजाने विरोधकांच्या गोटात चांगलीच अस्वस्थता पसरल्याचे चित्र दिसत आहे.**



### महिला सक्षमीकरण आणि विकासकामांचा अजेंडा

प्रचारादरम्यान राजेंद्र शिंदे यांनी प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या प्रश्नांना हात घातला आहे. "बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या हाताला रोजगार मिळवून देणे ही आपली प्राथमिकता असेल," असे आश्वासन त्यांनी दिले आहे. त्यासोबतच:

गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावणे, वीज समस्या आणि अंतर्गत रस्ते सुधारणे. प्रशासकीय अनुभवातून गावचा सर्वांगीण विकास साधणे."आम्ही लोकांच्या समस्या जाणून घेऊन कामावर लक्ष केंद्रित करत आहोत. जनतेचा मिळणारा आशीर्वाद पाहता, कुडाळ गटात तुतारीचा विजय निश्चित आहे," असा विश्वास यावेळी उमेदवारांकडून व्यक्त करण्यात आला.

### जनसंपर्क हीच मोठी 'शिदोरी'

पंचायत समितीचे उमेदवार राजेंद्र शिंदे (काका) यांची प्रतिमा एक अभ्यासू आणि लोकाभिमुख नेता अशी आहे. मेढा येथे मुद्रांक विक्रेता म्हणून काम करताना त्यांनी निर्माण केलेला दांडगा जनसंपर्क आणि कुडाळ विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन म्हणून केलेले कार्य ही त्यांची मोठी ताकद ठरत आहे. प्रतापगड सहकारी साखर कारखान्याचे संचालक आणि ग्रामपंचायत सदस्य म्हणून लाभलेला प्रशासकीय अनुभव निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे.

### घरोघरी पोहोचण्यावर भर

पक्षाच्या आदेशानुसार, कोणताही बडेजाव किंवा 'धांगडधिंगा' न करता, अत्यंत संयमित पद्धतीने प्रचार यंत्रणा राबवली जात आहे. राजेंद्र शिंदे प्रत्येक गावातील प्रत्येक नागरिकापर्यंत प्रत्यक्ष घरोघरी जाऊन संवाद साधत आहेत. या 'डोअर टू डोअर' कॅम्पेनमुळे मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या कामाचा धबधबा विरोधकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

# मासिक पाळीदरम्यान आरोग्य हा मूलभूत हक्क

## शाळांमध्ये मोफत सॅनिटरी पॅड्स देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

महाईन्यूज । नवी दिल्ली

**संविधानातील जीवनाच्या हक्काचा भाग म्हणून मासिक पाळीच्या आरोग्याचा हक्क असल्याचे जाहीर करत, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना शाळकरी मुलींना मोफत पर्यावरणाला कमी हानी पोहोचवणारे (ऑक्सो-बायोडिग्रेडेबल) सॅनिटरी नॅपकिन्स देण्याचे तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शौचालये उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.**



लैंगिक न्याय आणि शिक्षणातील समानता निश्चित करण्यासाठी दिलेल्या या महत्त्वपूर्ण निर्णयात, न्यायमूर्ती जे. बी. परडीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने सरकारी, अनुदानित किंवा खासगी अशा सर्व प्रकारच्या शाळांमध्ये या सुविधा देणे बंधनकारक असल्याचे सांगितले. न्यायमूर्ती परडीवाला यांच्या या निर्णयात आदेशांचे पालन न झाल्यास कठोर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये खासगी शाळांची मान्यता रद्द करणे आणि सरकारी शाळांमधील त्रुटींकरिता थेट राज्य सरकारांना जबाबदार धरणे यांचा समावेश आहे.

'संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवनाच्या हक्कामध्ये मासिक पाळीच्या आरोग्याचा हक्कही समाविष्ट आहे. सुरक्षित, प्रभावी आणि परवडणाऱ्या मासिक पाळी व्यवस्थापन सुविधांमुळे मुलींना लैंगिक व प्रजनन आरोग्याचा सर्वोत्तम दर्जा मिळतो. निरोगी प्रजनन जीवनाच्या हक्कामध्ये लैंगिक आरोग्याविषयी शिक्षण आणि माहिती मिळण्याचाही हक्क समाविष्ट आहे,' असे खंडपीठाने नमूद केले.

मुलींना सॅनिटरी नॅपकिन्स शक्यतो शौचालयांच्या परिसरात व्हेंडिंग मशीनद्वारे उपलब्ध करून द्यावेत. ते त्वरित शक्य नसल्यास, शाळेतील ठरावीक जबाबदार व्यक्तीकडे ही व्यवस्था असावी, असेही सांगण्यात आले. शौचालयांबाबत, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी 'प्रत्येक शाळेत वापरता येतील अशी, पाण्याची सोय असलेली, आणि मुले, मुली यांना स्वतंत्र शौचालये' उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देश देण्यात आले.

### गोपनीयता जपणे ही सरकारची जबाबदारी

'गोपनीयता आणि प्रतिष्ठा या एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. त्यामुळे गोपनीयतेच्या हक्कामध्ये केवळ हस्तक्षेप न करणेच नव्हे, तर व्यक्तीची गोपनीयता सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाय करणेही राज्याची जबाबदारी आहे,' असे न्यायालयाने स्पष्ट केले. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी प्रत्येक शाळेत मासिक पाळी व्यवस्थापनासाठी स्वतंत्र जागा तयार करावी, असे निर्देश देण्यात आले. तसेच मासिक पाळी आणि पौगंडावस्था याबाबत जनजागृती व प्रशिक्षण देण्यासंबंधीही आदेश दिले गेले.

> कोट मासिक पाळी व्यवस्थापनाच्या सुविधांचा अभाव मुलींच्या प्रतिष्ठेला धक्का देतो. कारण प्रतिष्ठा म्हणजे अपमान, बहिष्कार किंवा टाळता येण्यासारख्या वेदनांशिवाय जगणे असते.
>
> – सर्वोच्च न्यायालय

# विकासाला गती देण्यासाठी सरकारचा तीन 'कर्तव्य' अजेंडा

महाईन्यूज । नवी दिल्ली

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात तीन प्रमुख कर्तव्यांवर विशेष भर देण्यात आला आहे. त्यापैकी पहिले कर्तव्य म्हणजे देशाच्या आर्थिक विकासाला गती देणे आणि तो दीर्घकालीन स्वरूपात टिकवून ठेवणे. यासाठी स्पर्धात्मकता वाढवणे तसेच अस्थिर जागतिक घडामोडींविरुद्ध अर्थव्यवस्थेची लवचिकता मजबूत करणे यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.**





दुसरे कर्तव्य म्हणजे लोकांच्या क्षमतांचे बळकटीकरण करून त्यांना भारताच्या समृद्धीच्या प्रवासात सक्रिय भागीदार बनवणे आणि त्यांच्या आकांक्षा पूर्ण करणे होय. तिसरे कर्तव्य 'सबका साथ, सबका विकास' या तत्त्वावर आधारित असून, प्रत्येक कुटुंब, समुदाय आणि प्रदेशाला आवश्यक संसाधने, सुविधा तसेच अर्थपूर्ण सहभागाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर त्याचा भर आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण सलग नववा अर्थसंकल्प मांडत आहेत. अर्थसंकल्प मांडताना त्यांनी तीन कर्तव्यांवर भर दिला जाणार असल्याचे सांगितले. अर्थमंत्र्यांनी दिलेली तीन कर्तव्ये सविस्तरपणे जाणून घ्या..

### पहिले कर्तव्य

देशाच्या आर्थिक विकासाचा वेग अधिक वाढवणे आणि तो दीर्घकाळ टिकवून ठेवण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. यासाठी देशाची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढवणे, उद्योगांना चालना देणे तसेच जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

### दुसरे कर्तव्य

देशातील जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. त्यासाठी नागरिकांचे कौशल्य विकास, क्षमतावृद्धी आणि रोजगारक्षमतेत वाढ करून त्यांना भारताच्या समृद्धीकडे वाटचाल करणाऱ्या विकासप्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेण्यात येणार आहे.

### तिसरे कर्तव्य

'सबका साथ, सबका विकास' या तत्त्वावर आधारित सर्वसमावेशक विकास साध्य करणे हे या कर्तव्याचे ध्येय आहे. यामध्ये प्रत्येक कुटुंब, समाज आणि प्रदेशाला साधन-संपत्ती, मूलभूत सुविधा तसेच प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

# फोटोशूटच्या नावाखाली अश्लील मागणी! प्रसिद्ध अभिनेत्रीने सांगितला धक्कादायक प्रसंग

मनोरंजनसृष्टीत काम करताना कलाकारांना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्यात अभिनेत्रींना तर अनेक वाईट घटनांचा सामना करावा लागतो. अशातच एका अभिनेत्रीनं तिच्याबरोबरचा वाईट प्रसंग सांगितला आहे. एका प्रसिद्ध अभिनेत्रीकडे फोटोग्राफरनं अश्लील मागणी केली होती. त्याबद्दल तिनं नुकताच खुलासा केला आहे आणि ती अभिनेत्री म्हणजे ऐश्वर्या राजेश. तमीळ, तेलुगू, मल्याळम व हिंदी चित्रपटसृष्टीत आपली ओळख निर्माण करणारी अभिनेत्री ऐश्वर्या राजेश हिने अलीकडेच आपल्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात एक अस्वस्थ करणारा अनुभव आल्याचं सांगितलं. एका मुलाखतीत तिनं एका फोटोग्राफरनं तिच्याकडे "तुझं शरीर पाहायचं आहे", अशी विचित्र मागणी केली असल्याचं सांगितलं.

निखिल विजयेंद्र सिम्हा यांच्या पॉडकास्टमध्ये बोलताना ऐश्वर्यानं तिच्याबरोबरचा हा प्रकार सांगितला. तिनं सांगितलं की, हा अनुभव तिच्यासाठी खूप धक्कादायक होता. ती म्हणाली, "मी तेव्हा खूप लहान होते आणि माझ्या भावाबरोबर शूटिंगच्या ठिकाणी गेले होते. फोटोग्राफरनं भावाला बाहेर बसायला सांगितलं, मला आत नेलं, हातात अंतर्वस्त्र दिलं आणि म्हणाला 'मला तुझं शरीर पाहायचं आहे'."

ऐश्वर्या पुढे म्हणाली, "त्या वयात मला या इंडस्ट्रीबद्दल काहीच माहीत नव्हतं. कदाचित इथे हे असंच असतं, असं वाटून मी जवळपास तयारही झाले होते; पण मनात काहीतरी चुकीचं घडत असल्यासारखं वाटत होतं".

त्या कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी तिने फोटोग्राफरला सांगितलं की, तिला आधी भावाची परवानगी घ्यावी लागेल आणि ती तिथून निघून गेली. ती म्हणाली, "मला आजही वाटतं, त्यानं अशा कितीतरी मुलींना हे करायला भाग पाडलं असेल. मी हा प्रकार माझ्या भावालाही कधी सांगितला नाही."

याच संवादात ऐश्वर्यानं आणखी एक प्रसंग सांगितला. "एकदा मी शूटिंगला उशिरा पोहोचले होते. तेव्हा दिग्दर्शक सगळ्यांसमोर माझ्यावर ओरडले. तो माझ्यावर रागावलेला नव्हता; पण तो नेहमी माझी तुलना इतर अभिनेत्रींशी करायचा. माझी चूक असू शकते; पण सगळ्यांसमोर अशी अपमानास्पद वागणूक देऊ नये," असे तिने स्पष्टपणे सांगितले.


दरम्यान, ऐश्वर्या राजेशच्या कामाबद्दल सांगायचे झाले तर, तिने 'अथाकथी', 'अवर्गलम इवर्गलम', 'काका मुत्ताई', 'वडा चेन्नई' आणि 'काना' यासारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम केलंय. 'वर्ल्ड फेमस लव्हर', 'का पे रणसिंगम', 'रिपब्लिक' आणि 'थिट्टम इरांडू' सारख्या चित्रपटांसाठी तिचं खूप कौतुक करण्यात आलं.

ऐश्वर्या राजेश नुकतीच अर्जुनबरोबरच्या तमीळ चित्रपट 'थीयावर कुलैगल नडुंगा'मध्ये दिसली होती. तसेच ती २०२५ मधील हिट चित्रपट 'संक्रांतीकी वस्तुनाम' मध्येही झळकली आहे. सध्या ती भरत दर्शन दिग्दर्शित 'ओह..! सुकुमारी' या चित्रपटाचे शूटिंग करीत आहे. या चित्रपटात अभिनेता थिरुवीर मुख्य भूमिकेत आहे.



# बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घराबाहेर गोळीबार, चारवेळा झाली फायरिंग

मुंबईतील जुहू परिसरातील बॉलिवूड चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता रोहित शेट्टीच्या घराबाहेर १ फेब्रुवारीच्या पहाटे गोळीबार झाल्याचे वृत्त आहे. चारवेळा गोळीबाराचा आवाज आल्याचं म्हटलं जातंय. या घटनेत कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. दरम्यान, या घटनेदरम्यान रोहित शेट्टी घरात होता की नाही हेही अद्याप स्पष्ट झालेले नाही. गोळीबारामागील हेतू अद्याप समजू शकलेले नाही, असं पोलिसांनी सांगितलं. जुहू पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली असून तपास सुरू केला आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा तपास करत असून गुन्हेगारांची ओळख पटवण्यासाठी प्रत्येक संभाव्य दृष्टिकोनाचा शोध घेत आहेत. तसंच, शेट्टीच्या जुहू टॉवरभोवती कडक सुरक्षा तैनात करण्यात आल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं. IANS ने दिलेल्या वृत्तानुसार, रोहित शेट्टीच्या घरावर तीन बुलेटच्या खुणा सापडल्या आहेत. १२ तपास पथक तपास करत असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चौकशी केली जात आहे. तसंच, बंगल्यावर मोठ्या प्रमाणात सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. रोहित शेट्टीचा २०२४ साली सिंघम अगेन हा चित्रपट आला होता. या चित्रपटाचं त्याने दिग्दर्शन केलं होतं. यामध्ये अजय देवगण, करीना कपूर, दीपिका पदुकोण, रणवीर सिंग, अर्जुन कपूर, अक्षय कुमार, टायगर श्रॉफ आणि जॅकी श्रॉफ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. जवळजवळ ३५० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आलेल्या या चित्रपटाचे जगभरातील बॉक्स ऑफिस कलेक्शन सुमारे ४०० कोटी रुपये होते. या ॲक्शन चित्रपटाला रोहित शेट्टी पिक्चर्स, रिलायन्स एंटरटेनमेंट, जिओ स्टुडिओज आणि देवगण फिल्म्स यांनी संयुक्तपणे पाठिंबा दिला आहे. तसंच, सध्या तो मुंबईचे माजी पोलीस आयुक्त राकेश मारिया यांच्या जीवनावर आधारित एका चित्रपटावर काम करत आहे. या चित्रपटात अभिनेता जॉन अब्राहम आयपीएस राकेश मारिया यांची भूमिका साकारणार असल्याचं म्हटलं जात आहे.



# ..म्हणून तब्बू स्वत:च्या नावापुढे वडिलांचं नाव लावत नाही

बॉलीवूडमधील काही दर्जेदार अभिनेत्रींपैकी एक म्हणजे तब्बू. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणाऱ्या तब्बूने अनेकदा तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल मोकळेपणाने सांगितलं आहे. अभिनेत्रीनं आपल्या वडिलांना भेटलं नसल्याचं आणि वडिलांचं आडनावही वापरत नसल्याविषयी प्रतिक्रिया दिली आहे.

तब्बू फक्त तीन वर्षांची असताना तिचे आई-वडील वेगळे झाले आणि त्यानंतर वडिलांशी तिचा कसलाच संबंध राहिला नाही.

'RENDEZVOUS WITH SIMI GAREWAL' या कार्यक्रमात सिमी गरेवाल यांच्याशी बोलताना तब्बू म्हणालेली, "माझं बालपण खूप छान गेलं. आई-वडिलांचा घटस्फोट झाल्यानंतर मी माझ्या आजी-आजोबांबरोबर (आईच्या आई-वडिलांबरोबर) राहत होते. माझी आई शिक्षिका होती, त्यामुळे मी आजीबरोबर जास्त वेळ घालवायचे. आजी प्रार्थना करायची, पुस्तकं वाचायची आणि मी त्याच वातावरणात मोठी झाले."

त्याच मुलाखतीत तब्बूने वडिलांना भेटण्याची इच्छा नसल्याचेही सांगितले. तसेच तिने 'हाश्मी' हे वडिलांचे आडनाव का वापरले नाही, याचेही कारण दिले होते. ती म्हणाली, "मी कधीच वडिलांचे आडनाव वापरले नाही. मला ते वापरणं महत्त्वाचं वाटलं नाही. माझं पूर्ण नाव तबस्सुम फातिमा असं होतं. शाळेत 'फातिमा' हेच माझं आडनाव होतं." ती पुढे म्हणालेली, "माझ्याकडे वडिलांच्या कोणत्याही आठवणी नाहीत. माझी बहीण कधीतरी त्यांना भेटली आहे, पण मला कधीच त्यांना भेटावंसं वाटलं नाही. मी जशी मोठी झाले आणि ज्या ज्या गोष्टी मला आयुष्यात मिळाल्या, त्यात मी समाधानी आहे." तब्बू तीन वर्षांची असताना तिच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला होता. त्यानंतर तिच्या वडिलांनी दुसरे लग्न केले.



# अल्कराजचं 'करिअर ग्रँड स्लॅम' फत्ते..!

## कार्लोस अल्काराझने पटकावलं पहिलं ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपद

**महाईन्यूज । मेलबर्न**

**स्पेनच्या कार्लोस अल्कराजने जागतिक टेनिसमधील दिग्गज खेळाडू नोवाक जोकोविचला पराभूत करून 'ऑस्ट्रेलियन ओपन २०२६' च्या किताबावर आपले नाव कोरले आहे. रॉड लेव्हर एरिना येथे रंगलेल्या या चित्तथरारक अंतिम सामन्यात अल्कराजने २-६, ६-२, ६-३, ७-५ अशा फरकाने विजय मिळवून आपले 'करिअर ग्रँड स्लॅम' पूर्ण केले. वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी चारही ग्रँड स्लॅम जेतेपदे जिंकणारा तो जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. या कामगिरीसह त्याने स्पेनचाच माजी टेनिस स्टार राफेल नादालचा विक्रम मोडीत काढला.**



### करियर स्लॅम म्हणजे काय?

ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकणं हे टेनिसमधील मोठं यश मानलं जातं. दरवर्षी ऑस्ट्रेलियन ओपन, फ्रेंच ओपन, विम्बल्डन आणि यूएस ओपन या चार प्रमुख स्पर्धांमध्ये विजेतेपदासाठी खेळाडू झुंज देतात. मात्र, या चारही ग्रँडस्लॅम स्पर्धा एका खेळाडूने जिंकणं याला करियर स्लॅम म्हटलं जातं. कार्लोस अल्काराझने ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम सामन्यात नोवाक जोकोविचचा पराभव करत चारही ग्रँडस्लॅम जिंकण्याचा टप्पा पूर्ण केला आणि आपल्या कारकिर्दीतील पहिला 'करिअर ग्रँडस्लॅम' साकारला. या ऐतिहासिक यशासह अल्काराझ हा पराक्रम करणारा नववा आणि इतिहासातील सर्वात तरुण पुरुष टेनिसपटू ठरला आहे.

२४ ग्रँड स्लॅम विजेतेपदे नावावर असलेल्या जोकोविचविरुद्ध अल्कराजने रविवारी (दि. १) आपल्या खेळाचा दर्जा उंचावला. सामन्याच्या सुरुवातीला जोकोविचने आपला दांडगा अनुभव पणाला लावत पहिला सेट ६-२ असा सहज जिंकून वर्चस्व गाजवले. मात्र, दुसऱ्या सेटपासून अल्कराजने जोरदार मुसंडी मारली. त्याने जोकोविचची सर्व्हिस मोडीत काढत दुसरा सेट ६-२ आणि तिसरा सेट ६-३ ने जिंकून सामन्यात २-१ अशी आघाडी घेतली.

निर्णायक चौथ्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी प्रत्येक गुणासाठी प्रचंड घाम गाळला. १० वेळा ऑस्ट्रेलियन ओपन जिंकणाऱ्या जोकोविचने हार न मानता झुंज दिली, परंतु अल्कराजच्या चपळाईसमोर त्याचे प्रयत्न तोकडे पडले. अल्कराजने हा सेट ७-५ ने जिंकत ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.

चारही मोठी जेतेपदे (विम्बल्डन, यूएस ओपन, फ्रेंच ओपन आणि ऑस्ट्रेलियन ओपन) जिंकणाऱ्या अल्कराजने नडालचा २४ व्या वर्षी हा कारनामा करण्याचा विक्रम मोडला आहे. विशेष म्हणजे, जोकोविचने आजवर कधीही ऑस्ट्रेलियन ओपनची अंतिम फेरी गमावली नव्हती, मात्र अल्कराजने आपल्या पहिल्याच मेलबर्न फायनलमध्ये हा करिष्मा करून दाखवला.

# पाकिस्तानी गोलंदाजावर T20 WC पूर्वी चिटिंगचा आरोप

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत पाकिस्तानने मालिका जिंकली आहे. पण या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजावरून मोठा गदारोळ पाहायला मिळाला. पाकिस्तानचा संघ टी-२० वर्ल्डकपमध्ये खेळणार का नाही याबाबत अनिश्चितता आहे. पण यादरम्यान पाकिस्तानच्या गोलंदाजावर चिटिंग करण्याचा आरोप केला आहे.**




### कशी आहे तारिकची गोलंदाजी ॲक्शन?

खरं तर, उजव्या हाताचा ऑफ-ब्रेक गोलंदाज तारिक याची गोलंदाजी ॲक्शन इतरांप्रमाणे साधारण नाहीये. तो चेंडू टाकण्यापूर्वी थांबतो आणि नंतर खांद्यावरून चेंडू न टाकता बाजूने हात आत आणून चेंडू टाकतो. हे जणू कोणीतरी दगड फेकल्यासारखे भासतं. पण अशी गोलंदाजी करणारा तो पहिला खेळाडू नाहीये; लसिथ मलिंगा ज्या पद्धतीने गोलंदाजी करायचा त्यासारखाच आहे. केदार जाधव आणि रियान पराग यांनीही भारतासाठी अशीच गोलंदाजी केली आहे. शिवाय, तारिकची गोलंदाजीची कृती आयसीसीने दोनदा तपासली आहे आणि ती क्लिअर असल्याचे आढळून आले आहे. उस्मान तारिकलादेखील ग्रीनने केलेली कृती दिसली आणि त्यानंतर त्याने तारिकची खिल्ली उडवली. सामन्यानंतर तारिकने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक रडणाऱ्या मुलाची स्टोरी शेअर केली.

टी-२० विश्वचषकासाठी निवड झालेला पाकिस्तानी फिरकी गोलंदाज उस्मान तारिक पुन्हा एकदा त्याच्या गोलंदाजी ॲक्शनमुळे वादात सापडला आहे आणि यावेळी सामन्यादरम्यान त्याच्यावर चिटिंगचा आरोप करण्यात आला आहे. पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यादरम्यान, उस्मान तारिकच्या गोलंदाजीच्या ॲक्शनवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं.

ऑस्ट्रेलियाच्या डावात कॅमेरून ग्रीन फलंदाजी करत होता आणि वेगाने धावा काढत होता. त्यानंतर ११ व्या षटकात फिरकी गोलंदाज तारिक गोलंदाजी करायला आला आणि त्याने चौथ्या चेंडूवर ग्रीनला बाद केलं. मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात ऑस्ट्रेलियन फलंदाजाने आपली विकेट गमावली, त्यानंतर गोंधळ सुरू झाला. बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतणाऱ्या कॅमेरून ग्रीनने सीमारेषा ओलांडताना दगडफेक करण्याची नक्कल करून आपला राग व्यक्त केला.

पण प्रत्यक्षात, ग्रीनच्या नक्कलमुळे फिरकी गोलंदाज उस्मान तारिकच्या गोलंदाजीच्या ॲक्शनवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते, जो अनेकदा वादात सापडला आहे. ग्रीनच्या या कृतीमुळे वाद निर्माण झाला आणि सोशल मीडियावर तारिकच्या गोलंदाजीवरून चिटिंग केली जात असल्याचा आरोप केला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। सोमवार।

दि. 02 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महानगरपालिकेतील ३८ कर्मचारी सेवानिवृत्त

## प्रामाणिक सेवेला सलाम; दीर्घ सेवेनंतर कर्मचाऱ्यांचा महापालिकेला निरोप

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून माहे जानेवारी २०२५ अखेर नियत वयोमानानुसार ३३ कर्मचारी सेवानिवृत्त झाले, तर ५ कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्याची माहिती मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांनी दिली.**



माहे जानेवारी २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये उप अभियंता राजेश जगताप, असिस्टंट मेट्रन सुवर्णलता भोसले, जेनीफर शेफर्ड, गटनिदेशक राजकुमार तिकोने, कार्यालय अधिक्षक किशोर काटे, चंद्रकांत विरणक, सिस्टर इन्चार्ज सरिता कुलकर्णी, रत्नमाला जगताप, ए. एन. एम. मानसी पुणतांबेकर, उपशिक्षक पुष्पलता धोकटे, इलेक्ट्रिक मोटार पंप ऑपरेटर अनंत उदुगडे, वायरलेस ऑपरेटर दिलीप औटी, मुकादम पुखराज रेनवा, सुरक्षा सुपरवायझर रामचंद्र वाजे, रखवालदार भालचंद्र भोसले, विलास गजरमल, मजूर काशिनाथ लांडे, आनंद जाधव, सुरेश किंद्रे, ज्ञानेश्वर बालवडकर, विलास लांडे, जानार्दन कदम, गणेश गव्हाणे, शिपाई राजू शिंदे, गायत्री जाधव, ज्ञानेश्वर भरेकर, देवीदास जगताप, सफाई कामगार रत्नाबाई धोत्रे, सुमन सावंत, अनिता माछरे, राजेश टकले, विलास सिताराम गाडे, सफाई सेवक अशोक शेट्टी यांचा समावेश आहे.

तर स्वेछानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये अटेंडंट मदतनीस संतोष गायकवाड, मुकादम प्रमोद अंदे, सफाई कामगार पवित्रा भागवत, सत्यवान वाळके, गटरकुली हणुमंता मुठे यांचा समावेश आहे.

> “ महापालिका सेवेतून सेवानिवृत्त होत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात प्रामाणिकपणा, कार्यालयीन शिस्त आणि जबाबदारीची जाण ठेवत नागरिकाभिमुख सेवा दिली,त्यांच्या अनुभवाचा आणि योगदानाचा महापालिकेच्या कामकाजावर सकारात्मक ठसा उमटलेला आहे. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल.
>
> - **प्रफुल्ल पुराणिक,** जनता संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क विभाग.

# अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्राच्या विकासाला वेग; आमदार जगताप

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ हा विकसित भारताकडे नेणारा दमदार आणि दूरदृष्टीचा विकसित भारताचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया आमदार शंकर जगताप यांनी दिली आहे. या अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्रासह देशाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मलाजी सीतारामन यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर केला. विकास, लोकांच्या वाढत्या आकांक्षा आणि ‘सबका साथ, सबका विकास’ या तीन सूत्रांवर आधारित हा अर्थसंकल्प आहे असे आमदार शंकर जगताप म्हणाले.**



आमदार जगताप पुढे म्हणाले की, मुंबई–पुणे हायस्पीड कॉरिडॉर, पायाभूत सुविधा आणि शहरी विकासासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमुळे महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला वेग मिळणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारी भांडवली खर्च १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत ठेवण्यात आली आहे. पायाभूत सुविधांवर वाढविण्यात आलेल्या गुंतवणुकीकडे लक्ष वेधत ते म्हणाले, “आजच्या गुंतवणुकीवरून सरकारचा विकासावर असलेला ठाम विश्वास स्पष्ट होतो. “महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. ५ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या मोठी असल्याने, शहरी पायाभूत सुविधा, वाहतूक, गृहनिर्माण आणि रोजगारनिर्मितीला मोठी संधी निर्माण होणार आहे,” असे त्यांनी नमूद केले.

या अर्थसंकल्पात शेती, पशुपालन आणि मत्स्यव्यवसायाला चालना देण्यात आली असून शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला. तसेच महिला नेतृत्वाखालील उद्योगांना प्रोत्साहन, प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल उभारण्याचा निर्णय आणि महिला-शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद ही सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची पावले असल्याचे त्यांनी सांगितले.

डिजिटल अर्थव्यवस्थेबाबत बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले की, डेटा सेंटर उभारणाऱ्या कंपन्यांना २०४७ पर्यंत करसवलत देण्याचा निर्णय हा भारताला डिजिटल हब बनवण्याच्या दिशेने निर्णायक ठरेल. यामुळे परदेशी गुंतवणूक वाढेल, क्लाऊड, AI आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल.

सीमाशुल्कात सवलत देत १७ कर्करोगविरोधी औषधे आणि ७ इतर दुर्मिळ आजारांच्या औषधांना मूलभूत सीमाशुल्कातून सूट देण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. ‘लखपती दिदी’ योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी निर्माण करण्याची योजना अर्थसंकल्पातील एक महत्त्वाची बाब असून, प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना देखील तयार करण्यात आली आहे. रोजगारनिर्मिती, आरोग्य सेवा, गुंतवणूक आणि इन्फ्रास्ट्रक्चरला दिलेले प्राधान्य देशाला तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे वेगाने घेऊन जाईल,” असेही त्यांनी स्पष्ट केले.एकूणच, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ हा सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणारा आणि महाराष्ट्रासह देशाच्या दीर्घकालीन प्रगतीचा मजबूत पाया घालणारा असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

# SPARC 2026 मध्ये चिंचवडच्या शार्दुल देशिंगेचे राष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश

## व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवडच्या विद्यार्थ्याची राष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी


**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**



**SUSTAINABLE PROJECT AND RESEARCH CHALLENGE (SPARC) 2026 या राष्ट्रीय पातळीवरील विज्ञान प्रकल्प स्पर्धेत MSS (व्ही. के. माटे) हायस्कूल, श्रीधरनगर, चिंचवड येथील इयत्ता आठवी तुकडी 'ब' मधील विद्यार्थी शार्दुल प्रकाश देशिंगे याने प्रथम क्रमांक पटकावत राष्ट्रीय विजेतेपद मिळवले आहे. शाश्वत विकास (SUSTAINABILITY) हा या स्पर्धेचा मुख्य विषय असून, शार्दुलच्या अभिनव प्रकल्पाने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.**

शार्दुलने सादर केलेला 'मदर केअर प्रेशर कुकर' हा प्रकल्प स्वयंपाकघरातील सुरक्षितता, वाफेच्या अपघातांपासून संरक्षण, ऊर्जा बचत तसेच अन्नातील पोषक मूल्यांचे जतन या बाबी लक्षात घेऊन विकसित करण्यात आला आहे. प्रयोगशीलता, उपयुक्तता आणि समाजाभिमुख दृष्टिकोनामुळे या प्रकल्पाला परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली.

या प्रेशर कुकरच्या बाह्य पृष्ठभागावर ॲल्युमिनियम ऑक्साईडचे टिकाऊ कोटिंग देण्यात आले असून त्यामुळे गंज रोखला जातो व उष्णतेचे समसमान वितरण होते. सिरेमिक फायबर ब्लँकेट थरामुळे उष्णता अधिक काळ टिकून राहते व ऊर्जा बचत साधली जाते. स्वयंपाक करताना हातावर वाफ येऊ नये यासाठी स्टीम फ्लो डायव्हर्शन डिझाइन तसेच वाफेचा कार्यक्षम पुनर्वापर करून स्वयंपाकघर स्वच्छ ठेवण्याची प्रणाली या कुकरमध्ये विकसित करण्यात आली आहे.




उल्लेखनीय बाब म्हणजे, या प्रकल्पाची राज्यस्तरीय INSPIRE पुरस्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच GMRT (GIANT METREWAVE RADIO TELESCOPE) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय शालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धेतही शार्दुलने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

डी. वाय. पाटील कॉलेज (DYP DPU) येथील आंतरशालेय प्रकल्प स्पर्धेत त्याने द्वितीय क्रमांक मिळवला, तर एस. बी. पाटील कॉलेज येथे झालेल्या BRAIN WAVES स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. याशिवाय STEM LAB, पुणे आयोजित विज्ञान प्रकल्प स्पर्धेतही त्याने प्रथम पारितोषिक मिळवले आहे.

या यशस्वी प्रकल्पासाठी शार्दुलला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर, विज्ञान शिक्षिका सौ. मीना सकपाळ तसेच इतर विज्ञान शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

शार्दुल देशिंगेच्या या सातत्यपूर्ण यशामुळे शाळा, पालक व संपूर्ण परिसराचा नावलौकिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्वल झाला आहे. भविष्यात तो शाश्वत तंत्रज्ञान व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या यशाबद्दल मोरया शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी यांच्यात आनंदाचे वातावरण असून, शार्दुलच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अजित पवार यांच्या निधनाने शिक्षणक्षेत्राला मोठा धक्का; पुणे जिल्ह्यातील सर्व शिक्षणसंस्थांची बालगंधर्व रंगमंदिरात शोकसभा

**महाईन्यूज । पुणे**

**राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे शिक्षण क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. प्रत्येकाच्या मनातील अजितदादा यांच्या विषयीची भावना व्यक्त करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व शिक्षणसंस्थांची शोकसभा घेतली जाणार आहे. मंगळवारी (ता.3 फेब्रुवारी) सकाळी साडेदहा वाजता बालगंधर्व रंगमंदिरात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने या शोकसभेचे आयोजन केले आहे.**



त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, उपकुलगुरू, शिक्षणतज्ञ जिल्ह्यातील वेगवेगळ्या शिक्षण संस्थांचे पदाधिकारी, संस्थाचालक, शिक्षक उपस्थित राहणार आहेत. या शोकसभेत अजितदादांनी शिक्षणक्षेत्रात केलेल्या कामगिरीचा, घेतलेल्या धडाकेबाज निर्णयांचा, अजितदादा यांच्या स्वभाववैशिष्ट्यांच्या पैलूंना उजाळा मिळणार आहे. या शोकसभेसाठी शिक्षणक्षेत्रातील सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046